# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.08.2025** **वारःशुक्रवार**

---

- शेतकरी, मत्स्य व्यावसायिक आणि पशुपालकांच्या हिताशी भारत कधीच तडजोड करणार नाही - पंतप्रधानांचं प्रतिपादन
- विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे मतदार याद्यांबाबतचे आरोप निवडणूक आयोगानं फेटाळले
- काश्मीर खोऱ्यातल्या अनंतनाग रेल्वेस्थानकातून माल वाहतूक सुरू
- वैद्यकीय कारणासाठी भारतात येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत वाढ आणि
- आशियाई मुष्टीयुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताची चमकदार कामगिरी

**पंतप्रधान**

शेतकरी, मत्स्य व्यावसायिक आणि पशुपालकांच्या हिताशी भारत कधीच तडजोड करणार नाही असं ठाम प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. एम. एस. स्वामीनाथन जन्मशताब्दी आंतरराष्ट्रीय परिषदेत ते काल नवी दिल्लीत बोलत होते. सरकारचं शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असल्याचं ते म्हणाले. डॉ. स्वामीनाथन यांनी भारताला अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबी बनवण्यासाठी पुढाकार घेतला. आज भारत दूध, डाळी आणि ज्यूटच्या उत्पादनात जगात पहिल्या क्रमांकावर आहे. आता बदलत्या हवामानाचा सामना करू शकणाऱ्या आणि उष्णतारोधी पिकांवर भर देण्याची गरज आहे असं पंतप्रधान म्हणाले. 21 व्या शतकात विकसित देश होण्यासाठी भारत वचनबद्ध असून समाजाच्या प्रत्येक वर्गाच्या आणि प्रत्येक व्यवसायाच्या योगदानातून हे ध्येय गाठता येणं शक्य आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**संसद**

तटवर्ती जहाजबांधणी विधेयक 2025 संसदेत मंजूर करण्यात आलं आहे. लोकसभेनं आधीच मंजूर केलेल्या या विधेयकाला काल राज्यसभेतही मंजूरी मिळाली. देशाच्या किनारपट्टीवरील व्यापारी जहाजांच्या नियमनाबाबचं हे विधेयक आहे. या विधेयकामुळे देशाला लाभलेल्या विस्तीर्ण आणि धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या किनारपट्टी प्रदेशाची संपूर्ण क्षमता उपयोगात आणली जाईल असा विश्वास बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी राज्यसभेत व्यक्त केला.

**वैद्यकीय पर्यटन**

जानेवारी ते एप्रिल 2025 पर्यंत भारतात वैद्यकीय उद्देशाने 1 लाख 31 हजारांहून अधिक परदेशी पर्यटकांचं आगमन झालं आहे. या कालावधीत भारतात आलेल्या एकूण परदेशी पर्यटकांपैकी हे प्रमाण सुमारे 4 टक्के आहे. केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी काल राज्यसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. वैद्यकीय पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकार विविध योजना राबवत असून, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय 'हील इन इंडिया' मोहिमेला प्रोत्साहन देत आहे. वैद्यकीय पर्यटन परिसंस्था विकसित करण्यासाठी रुग्णालये, हॉटेल्स, एअरलाइन्स आणि नियामक

एजन्सीं यामधील सार्वजनिक-खासगी भागीदारी वाढवण्यावरही भर दिला जात आहे. केंद्र सरकारने 171 देशांच्या नागरिकांसाठी ई-मेडिकल व्हिसा आणि ई-मेडिकल अटेंडंट व्हिसा सुविधा वाढवल्या आहेत, असे पर्यटन मंत्रालयाने म्हटले आहे.

**राहुल गांधी**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार याद्यांबाबत केलेले आरोप निवडणूक आयोगानं फेटाळून लावले आहेत. हे सर्व आरोप दिशाभूल करणारे असून राहुल गांधी यांना त्यांच्या आरोपात काही तथ्य आहे असं वाटत असेल तर त्यांनी निवडणूक नियमांनुसार त्याबाबतचं शपथपत्र सादर करावं असं आयोगानं समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**उपराष्ट्रपती निवडणूक**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं आपला उपराष्ट्रपती पदासाठीचा उमेदवार निवडण्याचे सर्वाधिकार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि एनडीएचे राज्यसभेतले प्रमुख नेते जे. पी. नड्डा यांना दिले आहेत. आघाडीतल्या संसदीय पक्षनेत्यांच्या बैठकीत काल हा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, केंद्रीय निवडणूक आयोगानं काल उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी केली.

**हरघर तिरंगा**

येत्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात हर घर तिरंगा मोहीमेला आजपासून सुरुवात होत आहे. महाराष्ट्रात पुण्यासह छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, नागपूर इथं हर घर तिरंगा मोहीमेंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलं आहे.

**अनंतनाग स्थानक**

रेल्वेच्या उत्तर विभागानं काश्मीर खोऱ्यातलं अनंतनाग स्थानक माल वाहतुकीसाठी खुलं केलं आहे. काश्मीर खोऱ्यातल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या उद्देशानं अनंतनाग स्थानकावरुन माल वाहतूक सुरू केल्याचं रेल्वेनं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. यामुळे काश्मीर खोऱ्यातल्या फळं, हस्तकला आणि अन्य मालाला चांगली बाजारपेठ उपलब्ध होईल. विशेषतः हिवाळ्यात या स्वस्त, वेगवान आणि उत्तम दर्जाच्या वाहतूक सुविधेचा स्थानिकांना लाभ होणार आहे. काश्मीरच्या आर्थिक विकासासाठी केलेल्या या उपायांचं स्थानिक उद्योग संघटना आणि नागरिकांनी स्वागत केलं आहे.

**गडकरी**

देशातल्या रस्ते वाहतूक सुविधा जागतिक दर्जाच्या होत असल्यामुळे प्रवासाच्या वेळेत बचत होत आहे तसंच पर्यावरणाचंही रक्षण होत आहे असं प्रतिपादन केंद्रिय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. भारतीय बांधकाम साहित्य उत्पादन संघटनेच्या 75 व्या वार्षिक परिषदेत ते काल नवी दिल्लीत बोलत होते. सरकार रस्ते वाहतूक सुविधांचा जागतिक दर्जा कायम राखण्यावर भर देत असल्याचं सांगून पर्यावरण रक्षणासाठी उद्योजकांनी डिझेलचा वापर कमी करावा असं आवाहन त्यांनी केलं.

**पंतप्रधान ब्राझील**

ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुइझ इनसिओ लुला द सिल्वा यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केल्याची माहिती पंतप्रधान कार्यालयानं दिली आहे. या चर्चेत दोन्ही नेत्यांनी व्यापार, तंत्रज्ञान, उर्जा, संरक्षण, कृषी,

आरोग्य आणि नागरी संबंध या क्षेत्रातलं सहकार्य वाढवण्यासाठी सहमती दर्शवली. क्षेत्रिय आणि जागतिक घडामोडींबाबतही त्यांनी चर्चा केली.

**दोवाल पुतीन**

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवाल यांनी काल रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी चर्चा केली. तत्पूर्वी दोवाल यांनी रशियन सुरक्षा परिषदेचे सचिव सर्जेइ शोइगु यांची भेट घेतली. रशियाबरोबरचे भारताचे संबंध दीर्घकालिन आणि खास आहे. लवकरच पुतीन भारतभेटीवर येतील असं त्यांनी सांगितलं.

**फिलीपीन्स राष्ट्राध्यक्ष**

आशियाच्या विकासासाठी आणि समृद्धीसाठी भारतासोबत मोठ्या प्रमाणात भागीदारीची अपेक्षा फिलीपीन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनान्ड मार्कोस ज्युनिअर यांनी व्यक्त केली. फिलीपीन्स भारत व्यवसाय परिषदेत ते काल बेंगळुरू इथं बोलत होते. दोन्ही देश मिळून पुरवठा साखळी मजबूत करू शकतात आणि आशिया क्षेत्रातल्या सर्वसमावेशी नवोन्मेषाची जबाबदारी घेऊ शकतात असं मार्कोस म्हणाले.

**भारत-व्हिएतनाम**

भारत आणि व्हिएतनाममधे विविध क्षेत्रात सकारात्मक संबंध दृढ झाले असून, भारताने दिलेला पाठिंबा महत्त्वाचा असल्याचं व्हिएतनाम कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस तो लाम यांनी म्हटलं आहे. भारतासोबतच्या व्यापक धोरणात्मक भागीदारीची त्यांनी प्रशंसा केली आहे. हनोई इथं भारतीय राजदूत संदीप आर्य यांनी लाम यांच्याशी दोन्ही देशांमधील संबंधांबाबत चर्चा केली.  लाम यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना व्हिएतनाम भेटीसाठी आमंत्रित केलं आहे.

**थायलंड कंबोडिया युद्धबंदी**

थायलंड आणि कंबोडिया यांनी काल युद्धबंदी करारावर स्वाक्षरी केली. क्वालालंपूर इथं काल झालेल्या बैठकीत दोन्ही देशांनी शांततेसाठीच्या उपाययोजना करण्याबाबत चर्चा करुन क्षेत्रिय नियंत्रण यंत्रणा निर्माण करण्याची शपथ घेतली. परस्परांच्या ताब्यात असलेल्या सैनिकांना आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्यानुसार वागणूक देण्याचं आणि द्विपक्षीय चर्चा सुरू ठेवण्याचं दोन्ही देशांनी मान्य केलं.

**कैलास मानसरोवर यात्रा**

कैलास मानसरोवर यात्रेकरुंची शेवटची तुकडी काल सिक्कीममध्ये गंगटोक इथं पोहोचली. नथुला पासमार्गे कैलासमानसरोवर इथं जाणाऱ्या या तुकडीत अधिकाऱ्यांसह 50 व्यक्ती आहेत. पाच वर्षांनंतर यंदा नथुला पास मार्गे ही यात्रा जाणार आहे.

**मुष्टीयुद्ध**

19 वर्षांखालील आशियाई मुष्टीयुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत काल भारताच्या पाच पुरुष मुष्टीयोद्ध्यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. या स्पर्धेत भारताची 12 पदकं यामुळे निश्चित झाली आहेत. 7 महिला मुष्टीयोद्ध्यांनी याआधीच उपांत्य फेरीत स्थान मिळवलं आहे. दरम्यान, 22 वर्षांखालील गटाच्या आशियाई मुष्टीयुद्ध अजिंक्यपद स्पर्धाही सुरू आहेत. या स्पर्धेतही भारताला 13 पदकं मिळणं निश्चित आहे. या स्पर्धेत 5 मुष्टीयोद्ध्यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**